# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### नाशिक प्रादेशिक लॉजिस्टिक हबचे राज्यस्तरीय लॉजिस्टिक हबमध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(१) २४८३ (१०-०७-२०२५) श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंडिया मिडल इस्ट युरोप इकोनॉमिकल कॉरीडॉर अंतर्गत नाशिक प्रादेशिक लॉजिस्टिक हबचे राज्यस्तरीय लॉजिस्टिक हबमध्ये श्रेणीवर्धन करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या औद्योगिक विकासाला आणि निर्यात धोरणाला अधिक चालना देण्यासाठी सदर प्रादेशिक लॉजिस्टिक हबचे राज्यस्तरीय लॉजिस्टिक हबमध्ये श्रेणीवर्धन करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२०-०४-२०२६) :** (१) होय

दिनांक-३०/०३/२०२५ च्या पत्रान्वये नाशिक प्रादेशिक लॉजिस्टीक हबचे राज्यस्तरीय लॉजिस्टीक हबमध्ये श्रेणीवर्धन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे.

(२) महाराष्ट्र राज्य लॉजिस्टिक धोरण-२०२४ अंतर्गत राज्यामध्ये एकात्मिक लॉजिस्टिक परिसंस्था विकसित करण्याच्या दृष्टीने विविध स्तरांवरील लॉजिस्टिक हब, प्रादेशिक हब तसेच लॉजिस्टिक पार्क विकसित करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर धोरणानुसार राज्यामध्ये लॉजिस्टिक मास्टर प्लॅन तयार करून विविध झोनमध्ये लॉजिस्टिक पायाभूत सुविधा विकसित करण्याचा उद्देश निर्धारित करण्यात आलेला आहे.

नाशिक हे मुंबई-पुणे-नाशिक औद्योगिक त्रिकोणाचा महत्त्वपूर्ण घटक असून दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर तसेच विविध राष्ट्रीय महामार्ग व रेल्वे नेटवर्कद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी असलेले केंद्र आहे. तसेच नाशिक-सिन्नर परिसरामध्ये वाहन, अभियांत्रिकी, कृषी प्रक्रिया तसेच विविध उत्पादन क्षेत्रातील उद्योगांची लक्षणीय उपस्थिती असून लॉजिस्टिक क्रियाकलापांसाठी अनुकूल औद्योगिक

परिसंस्था उपलब्ध आहे.

महाराष्ट्र राज्य लॉजिस्टिक धोरण-२०२४ अंतर्गत तयार करण्यात आलेल्या लॉजिस्टिक मास्टर प्लॅनमध्ये नाशिक-सिन्नर परिसरात प्रादेशिक लॉजिस्टिक हब प्रस्तावित करण्यात आलेला आहे. सदर हब अंतर्गत लॉजिस्टिक पार्क तसेच पूरक पायाभूत सुविधा विकसित होऊन यामुळे उद्योगांना लॉजिस्टिक साखळी अधिक कार्यक्षम होण्यास मदत होऊन औद्योगिक वाढ व रोजगारनिर्मितीस चालना मिळण्याची शक्यता आहे. पूर्ण क्षमतेने सदर लॉजिस्टिक हब कार्यान्वित झाल्यानंतरच त्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या लॉजिस्टिक वाहतूक, उद्योगांची मागणी व आर्थिक व्यवहार्यता यांच्या आधारे पुढील स्तरावरील विस्तार अथवा श्रेणीवर्धनाचा विचार करणे अधिक योग्य राहील.

त्यामुळे सद्य:स्थितीत नाशिक प्रादेशिक लॉजिस्टिक हब कार्यान्वित होऊन अपेक्षित पायाभूत सुविधा व लॉजिस्टिक क्रियाकलाप स्थिर झाल्यानंतर परिस्थितीचा आढावा घेऊन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुऱ्हा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(२) ३०४८ (१५-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुऱ्हा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने रुग्णांना अधिक दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे दृष्टीकोनातून सदर प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करून ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालयात रूपांतरण करणेबाबतचा प्रस्ताव जिल्हा शल्यचिकित्सक, जळगाव यांचेमार्फत दिनांक ७ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान मा.सहसंचालक आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाची तपासणी केली आहे काय, तपासणीचे निष्कर्ष काय आहेत तसेच त्यानुसार कुऱ्हा प्राथमिक आरोग्य केद्र चे ग्रामीण रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.प्रकाश आबिटकर (२९-०४-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) शासन निर्णय दिनांक १ जानेवारी १९९६ नुसार दर ५ प्राथमिक आरोग्य केंद्रामागे १ ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्याचा निकष ठरविलेला आहे. आरोग्य संस्थांचे निकषानुसार तालुक्याच्या ठिकाणी १ ग्रामीण रुग्णालय असावे तसेच मुक्ताईनगर येथे उपजिल्हा रुग्णालय कार्यरत आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र, कुऱ्हा,(ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) चे ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबतच्या प्रस्तावाची आयुक्तालयाच्या स्तरावर छाननी करण्यात येऊन वस्तुस्थितीदर्शक प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

सार्वजनिक आरोग्य सेवेच्या पायाभुत सुविधांबाबत नियोजित पध्दतीने कामे करण्याची आवश्यकता विचारात घेऊन शासनाने दिनांक २९/०५/२०२५ अन्वये असा धोरणात्मक निर्णय घेतला आहे की,

आधीच हाती घेण्यात आलेली बांधकामे पूर्ण करुन त्या-त्या ठिकाणी आरोग्य सेवा तातडीने उपलब्ध करुन देण्यात याव्यात. त्यामुळे सद्य:स्थितीत नवीन संस्था मंजुरी व बांधकामे हाती घेण्यात येणार नाहीत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भंडारा जिल्ह्यात आंतरजातीय विवाह योजनेचे अनुदान मिळत नसल्याबाबत

**(३) ५४२४ (१४-१२-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यात सामाजिक समतेचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या आंतरजातीय विवाह प्रोत्साहन योजनेत निधी अभावी खंड पडल्याने गेल्या दोन वर्षापासून आंतरजातीय विवाह योजनेचे अनुदान प्रलंबित असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेंतर्गत आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना प्रत्यक्ष प्रोत्साहन पर ५० हजार रुपये दिले जातात परंतु माहे एप्रिल, २००० पासून आजपर्यंत तब्बल १९३ जोडपी या लाभापासून वंचित राहिली असून त्यांना अद्यापही अनुदान मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भंडारा जिल्ह्यासह राज्यातील आंतरजातीय विवाह योजनेतून लाभार्थ्यांना त्यांचे अनुदान त्वरीत वितरीत करण्यासंदर्भात प्रलंबित असलेले सर्व अर्ज तात्काळ निकाली काढण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (०६-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा या कार्यालयाकडे सन २०००-०१ ते २०१९-२० या कालावधीमध्ये प्राप्त झालेले सर्व अर्ज त्या-त्या वर्षात निकाली काढण्यात आलेले आहेत. सन २०२४-२५ मधील ८४ प्रलंबित अर्ज व सन २०२५-२६ मधील २१४ अर्ज असे एकूण २९८ अर्ज भंडारा जिल्ह्याकडे प्राप्त आहेत. त्यापैकी सद्य:स्थितीत २१९ अर्ज निकाली काढण्यात आलेले असून ७९ अर्ज प्रलंबित आहेत.
(३) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी आजपावेतो एकूण रुपये १९.८० कोटी इतका निधी आयुक्तालयास त्यांच्या मागणीनुसार वितरीत करण्यात आला असून समाजकल्याण आयुक्तालयाकडून भंडाऱ्यासह इतर सर्व जिल्ह्यांच्या मागणीनुसार सदर निधी संबंधित कार्यालयांना वितरीत करण्यात आला आहे. त्यानुसार सदरचा निधी खर्च करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे. तसेच सध्यस्थितीत भंडारा जिल्ह्यात प्रलंबित असलेल्या ७९ अर्जासह राज्यातील प्रलंबित असलेल्या अर्जांसाठी निधी वितरणाची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) येथील राष्ट्रीय शौर्य पुरस्कार प्राप्त विजेती श्रीमती हाली बरफ (जि.ठाणे, ता.शहापूर) यांच्यावर उपासमारीची वेळ आल्याबाबत

**(४) ५६२४ (१४-१२-२०२५) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील आदिवासी कन्या श्रीमती हाली बरफ हिने लहान वयात स्वत:च्या बहिणीचे प्राण बिबटयांच्या हल्ल्यातून वाचवल्याबद्दल तत्कालीन मा.पंतप्रधान यांचे हस्ते सन २०१३ मध्ये राष्ट्रीय शौर्य पुरस्कार देऊन गौरविण्यात आले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत सदर युवती ३१ वर्षाची झाली असून तिला कोणताही कायमस्वरुपी रोजगार नसल्याने ती कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी गावांगावात जाऊन मजूरी करत असल्याने सदर युवतीस नोकरी मिळावी अशी तिच्या कुटुंबियांनी शासनाकडे मागणी केली असून यासंदर्भात श्रमजीवी संघटनेने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रभारी प्रकल्पाधिकारी यांना त्याबाबतचे माहे ऑगस्ट,२०२५ मध्ये निवेदनही दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय पातळीवर राज्याच गौरव वाढवणाऱ्या या शौर्य पुरस्कार प्राप्त तरुणाचा सन्मान राखून हाली बरफ या राष्ट्रीय शौर्य पुरस्कारकर्तीस शासनाने कायमस्वरुपाची नोकरी दयावी किंवा सरकारी सेवेत समाविष्ट करुन तिच्या शौर्याचा सन्मान करावा, याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक वुईके (०२-०३-२०२६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) राष्ट्रीय शौर्य पुरस्कार विजेती श्रीम. हाली बरफ यांना प्रकल्प अधिकारी, शहापूर यांच्या अंतर्गत शासकीय आश्रमशाळा, आंबिवली येथे बहुउद्देशीय कर्मचारी म्हणून तात्पुरत्या स्वरुपात रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भूमी अभिलेख विभागातील भूकरमापक संवर्गातील ७०० रिक्त जागांवर पदभरती करण्याबाबत

**(५) ५६२५ (१४-१२-२०२५) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे : दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १९ मधील प्रश्न क्रमांक १४८६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूमी अभिलेख विभागात नव्याने भरती झालेल्या भूकरमापकांना अन्य शासकीय विभागांमध्ये सेवेची विभागात उत्तम संधी मिळाल्याने गेल्यावर्षी १२०० पदांपैकी सुमारे ७०० भूकरमापकांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त जागांवर नव्याने पदभरती करण्यास शासनाने मान्यता दिली असून त्यानुसार भूमी अभिलेख विभागात ७०० भूकरमापकांची भरती केली जाणार असल्याचे दिनांक २१ ऑगस्ट, २०२५ रोजी

वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भूकरमापक हे पद उन्नत करुन तयाची वेतनश्रेणी वाढवावी तसेच या भूकरमापकांना पाच वर्षानंतर थेट उपअधिक्षकांचा दर्जा दयावा असा प्रस्ताव भूमी अभिलेख विभागाने शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२७-०१-२०२६) :** (१) होय हे खरे आहे.
भूमि अभिलेख विभागात भरती झालेल्या भूकरमापकांना अन्य विभागात सरकारी नोकरीचा पर्याय मिळाल्याने गेल्यावर्षी १२०० पदापैकी सुमारे ७०४ जणांनी नोकरीचा राजीनामा दिला.
(२) होय हे खरे आहे.
भूमि अभिलेख विभागातील गट-क संवर्गातील सरळसेवेची माहे मे, २०२५ अखेरची रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार भूकरमापक पदाच्या एकूण ९०३ पदांसाठी दिनांक १३/११/२०२५ व दिनांक १४/११/२०२५ रोजी परीक्षा घेण्यात आली.
(३) हे अंशत: खरे आहे.

भूकरमापक संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमानुसार तांत्रिक अर्हता धारण करणारे कर्मचारी भूकरमापक पदावर नियुक्त होतात. सातव्या वेतन आयोगानुसार महसूल विभागातील भूकरमापक संवर्गास एस-६ अशी वेतनश्रेणी लागू आहे. तथापि, इतर विभागातील भूकरमापक संवर्गास एस-८ अशी वेतनश्रेणी लागू असल्याने इतर विभागातील भूकरमापक संवर्गाप्रमाणे एस-८ अशी सुधारित वेतनश्रेणी महसूल विभागातील भूकरमापक संवर्गास लागू करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(४) हे अंशत: खरे आहे.

भूकरमापक संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमानुसार तांत्रिक अर्हता धारण करणारे कर्मचारी भूकरमापक पदावर नियुक्त होतात. सातव्या वेतन आयोगानुसार महसूल विभागातील भूकरमापक संवर्गास एस-६ अशी वेतनश्रेणी लागू आहे. तथापि, इतर विभागातील भूकरमापक संवर्गास एस-८ अशी वेतनश्रेणी लागू असल्याने इतर विभागातील भूकरमापक संवर्गाप्रमाणे एस-८ अशी सुधारित वेतनश्रेणी महसूल विभागातील भूकरमापक संवर्गास लागू करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील बिरसा मुंडा या योजनेंतर्गत पेसा निधी वळविल्यामुळे ११ जिल्ह्यातील लाभार्थी वंचित राहिल्याबाबत

**(६) ५६२६ (१४-१२-२०२५) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास मंत्रालयाकडून सन २०१८-१९ व २०२०-२१ या वर्षी बिरसा मुंडा योजनेंतर्गत पेसा ग्रामपंचायतींना झालेल्या लाभाबाबत पेसा अभ्यासक डॉ.कुंडलिक केदारी माहितीच्या अधिकारात माहिती मागवली असता सदर निधी जनजातीय कार्य मंत्रालय, भारत सरकार यांनी पेसा निधी सामुहिक

वनहक्क आराखड्यासाठी वळवून पुनर्विनियोजित केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निधी पुनर्विनियोजित केल्यामुळे राज्यातील ११ जिल्ह्यातील पेसा ग्रामपंचायतीतील आदिवासी लाभार्थी वंचित राहिले असल्याचे माहे, सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र शासनाने पुनर्विनियोजित केलेल्या बिरसा मुंडा योजनेपासून राज्यातील वंचित राहिलेल्या गावांना लाभ मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके (२८-०२-२०२६) : (१)** होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर योजनेचे पुनर्विनियोजन जनजातीय कार्य मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून करण्यात आले असून गडचिरोली व यवतमाळ या आदिम बहुल जिल्ह्यातील सामूहिक वन व्यवस्थापन व संवर्धनाच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये सिमेंट चेक डॅम, गोडाउन,गॅबियन चेक डॅम, नर्सरी, स्मशानभूमी, दवाखाने,सांस्कृतिक भवन, पिण्याच्या पाण्याची सुविधा, ग्रंथालय, व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र इ. कामांचा समावेश आहे. सदर योजनेचा लाभ पेसा व आदिवासी क्षेत्रातील गावांनाच मिळणार आहे.

तसेच केंद्र शासनामार्फत राज्यातील आदिवासी गावांच्या विकासासाठी प्रधानमंत्री आदि आदर्श ग्रामविकास योजना (PMAAGY), प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान (PM-JANMAN), धरती आबा जनजाती ग्रामउत्कर्ष अभियान (DA-JGUA) यासारखे उपक्रम राबविण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कृषी विभागाकडून शेतकरी मासिकाचा खप वाढविण्यासाठी जिल्हा व तालुकास्तरावरील अधिकाऱ्यांना उद्दिष्ट दिल्याबाबत

**(७) ५६६९ (१४-१२-२०२५) श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.अमित गोरखे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या कृषी विभागाकडून शेतकरी मासिकाचा खप वाढवण्यासाठी जिल्हा व तालुकास्तरावरील अधिकाऱ्यांना उदिष्ट देण्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाडीबीटी पोर्टल द्वारे राबविण्यात येणाऱ्या कृषी योजनांचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांना या मासिकाचे वार्षिक वर्गणीदार बनण्यासाठी दबाव टाकला जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सहाय्यक कृषी अधिकारी शेतकरी मासिकाचे वर्गणीदार झाल्याशिवाय त्यांचे देयक अदा केले जाणार नाही असे त्यांना सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यावर दबाव आणि अनावश्यक आर्थिक

बोजा टाकून एखाद्या मासिकाच्या खपाचे उद्दिष्ट पूर्ण करणे उचित ठरणार नसल्याने सदर मासिक शेतकऱ्यांना अल्प दरात देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (१७-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) शेतकरी मासिक हे ना नफा ना तोटा तत्वावर चालविले जाते. प्रति अंक किंमत रुपये ३५/-असून त्यानुसार वार्षिक वर्गणी रुपये ४२० /- ऐवजी रुपये ४००/-इतकीच आकारली जाते. तसेच अंकाची Pdf copy विनामूल्य संकेत स्तळावर प्रसिध्द केली जाते.
(५) लागू नाही.

---

## मंठा (जि.जालना) येथील मिलिट्री प्रशिक्षण केंद्र व पोलीस प्रशिक्षण केंद्र पायलेट प्रोजेक्टच्या धर्तीवर सुरु करण्याबाबत

**(८) ५७३० (१४-१२-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंठा (जि.जालना) येथील पोलीस प्रशिक्षण व मिलिट्री प्रशिक्षण केंद्र नसल्यामुळे मंठा तालुक्यातील अनेक उमेदवारांना पोलीस प्रशिक्षण व मिलिट्री प्रशिक्षणापासून वंचित रहावे लागत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी अनेकवेळा मा.गृह मंत्री यांच्याकडे निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन मंठा तालुक्यात मिलिट्री प्रशिक्षण केंद्र व पोलीस प्रशिक्षण केंद्र पायलेट प्रोजेक्टच्या धर्तीवर सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२३-०३-२०२६) :** (१) अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिनस्त जालना येथे, पोलीस प्रशिक्षण केंद्र कार्यरत असून, सदर प्रशिक्षण केंद्रामध्ये, नवप्रविष्ट पोलीस प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यात येते. मिलिट्री प्रशिक्षण केंद्र, ही केंद्र शासनाच्या अखत्यारीतील बाब आहे.
(२) याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींकडून निवेदन प्राप्त झाल्याचे, अभिलेख्यामध्ये आढळून आले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उमरखेड (ता.तिवसा, जि.अमरावती) येथे वितरित केलेल्या रासायनिक खतामध्ये प्लास्टिकचे दाणे आढळल्याबाबत

**(९) ५७९० (१४-१२-२०२५) श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.अमित गोरखे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (ता.तिवसा, जि.अमरावती) येथे वितरित केलेल्या रासायनिक खतामध्ये प्लास्टिकचे दाणे आढळल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांने कृषी विभागाकडे असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात शेतकऱ्यांने कृषी विभागाच्या निदर्शनास आणून दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने राज्यभरात वितरित केलेल्या सर्व खतांची तपासणी करण्यासाठी कृषी विभागाकडून विशेष मोहीम राबवून शासनाच्या नियमावलीप्रमाणे शेतकऱ्यांना खतपुरवठा करुन त्याचा अहवाल शासनास सादर करण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, या अहवालानुसार शेतकऱ्यांना खतांमुळे झालेली नुकसान भरपाई देऊन पुन्हा या गोष्टींची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता तसेच या अनुषंगाने शासनाने चांगल्या दर्जाचे रासायनिक खत वितरित करण्यासंदर्भात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (१६-०२-२०२६) :** (१) होय

उंबरखेड, ता.तिवसा, जि अमरावती येथील शेतकऱ्याने त्याचे शेतातील कपाशी पिकाला दिलेले खत विरघळलेले नसल्याचे आढळून आल्याची तक्रार दिनांक ११/०९/२०२५ रोजी तालुका कृषी अधिकारी, तिवसा जि अमरावती यांचेकडे केली होती.
(२) व (३) सदर तक्रारीची तालुकास्तरीय तक्रार निवारण समिती मार्फत तपासणी केली असता सदर रासायनिक खतामध्ये प्लास्टीकचे दाणे आढळून आले नाही. सदर खत सल्फरकोटेड असल्याचे निदर्शनास आले होते. सदर खताचा नमूना शेतकरीसमक्ष घेऊन प्रयोगशाळेस तपासणीसाठी पाठविण्यात आले. प्रयोगशाळेच्या अहवालानुसार सदर युरीयामध्ये प्लास्टीक आढळून आले नाही. परंतु सदर युरीयामध्ये सल्फर घटकाचे प्रमाण कमी आढळून आल्यामुळे संबंधित खत उत्पादक कंपनी व विक्रेत्यांविरुध्द खत नियंत्रण आदेश १९८५ मधील तरतूदीनुसार पुढील कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील शेतकऱ्यांचे सात-बारा रद्द केल्याबाबत

**(१०) ५८१९ (१४-१२-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील तहसिलदार जिवती यांनी पुनर्विलोकनाचे अधिकार वापरून शेतकऱ्यांचे सात-बारा रद्द केल्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे दुष्काळासंबंधीची नुकसान भरपाई मिळणार नसल्याचे ऑक्टोबर, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सातबारा रद्द आदेश महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार आहेत काय,
(३) असल्यास, सदर शेतकऱ्यांचे सात-बारा पूर्ववत करून नुकसानग्रस्तांना मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०४-०३-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

जिवती तालुक्यात ७/१२ संगणकीकरणाचे काम करताना सर्व ७/१२ अभिलेखाची तपासणी करण्यात आली. एकूण १२७१८ सातबारा पैकी ७५९५ सातबारा योग्य तर विना फेरफार असलेले, फेरफार पंजी मध्ये खाडाखोड असलेले तसेच कुप नंबर व प्लॉट नंबर असलेले ५१२३ सातबारे हे अयोग्य असल्याचे निदर्शनास आले.

त्यापैकी वाटप आदेशाचे फेरफार न घेता तयार तयार झालेल्या ७/१२ चे प्रस्ताव ग्राम महसूल अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत सादर करण्यात आले. सदर ७/१२ चे पुनर्विलोकनाकरीता तहसिल कार्यालय, जिवती कार्यालयामार्फत उपविभागीय अधिकारी, राजुरा यांची परवानगी (MLRC १९६६ चे कलम २५८ अंतर्गत) मागण्यात आली. उपविभागीय अधिकारी, राजुरा यांच्यामार्फत सदर पुनर्विलोकनाची परवानगी देण्यात आली.

सदर पुनर्विलोकनाची परवानगी मिळालेल्या सर्वे नंबर वरील खातेदार यांना तहसिल कार्यालय, जिवती मार्फत नोटिस देऊन तदनंतर सुनावणी घेऊन त्यांचेकडील व ग्राम महसूल अधिकारी यांचेकडील अभिलेख, पुरावे तपासणी करण्यात आली. सादर केलेल्या पुराव्याची पडताळणी करूनच ज्या खातेदारांचे नाव वाटप आदेशाच्या फेरफारा शिवाय ७/१२ वर दाखल झाले आहेत, असेच ६५० सातबारा सुनावणीअंती आदेशाने बंद करण्यात आले.

जिवती तालुक्यात माहे सप्टेंबर,२०२५ या कालावधीत ९६२३ बाधित शेतकऱ्यांना DBT द्वारे अनुदान वितरणाची कार्यवाही सुरू आहे. माहे ऑक्टोबर २०२५ या कालावधीत शेतजमिनीचे/शेतपिकांचे नुकसान निरंक आहे.

(२) हो, आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य शासनाच्या अखत्यारीतील सुरक्षा रक्षक मंडळातील कर्मचाऱ्यांना अद्ययावत सोयी सुविधा पुरविण्याबाबत

**(११) १५२१७ (२८-१२-२०२२) श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या अखत्यारीतील विविध सुरक्षा रक्षक मंडळात गत काही वर्षापासून अनागोंदी कारभार सुरु असून सुरक्षा रक्षकांना देण्यात येणारे रेमंड कंपनीचे कापड आणि बाटा कंपनीचे बुट देण्यासाठी उक्त मंडळ उदासीन असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे २३ हजार सुरक्षा रक्षकांना आतापर्यंत गणवेशासाठी दोन वर्षातून चारवेळा रेमंड कंपनीचे कापड आणि बाटा कंपनीच्या बुटांचे वितरण करण्यात येत होते, परंतु काही काळापासून यात बदल करत सुरक्षा रक्षकांना सदर मंडळाकडून इतर कंपन्यांचे कापड आणि बूट दिले जात असून याबातच्या तक्रारी सुरक्षा रक्षकांनी ‘सुरक्षा रक्षक संघर्ष समिती‘ कडे केल्या असल्याची बाब दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रेमंड कंपनीचे गणवेशाचे कापड आणि बाटा कंपनीचे बुट सुरक्षा रक्षक मंडळाकडे पडून असतानाही मंडळाने काढलेल्या निविदेत कापड व बुटाच्या कंपनीबाबत उल्लेख नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदरहू सुरक्षा रक्षकांना पूर्वलक्षीप्रमाणे रेमंड कंपनीचे कापड व बाटा कंपनीचे बुट देऊन सदर कर्मचाऱ्यांना अद्ययावत सोयी सुविधा पुरविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (०४-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
दिनांक १४ ऑक्टोंबर, २०२२ रोजी वा त्यादरम्यान असे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(३) व (४) सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांना दिनांक ०१/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अधीन राहून सन २०१६-१७ पासून गणवेश व गणवेश साहित्याची खरेदी प्रक्रीया राबविण्यात येत आहे. सन २०२३-२४ करीता शासन निर्णय दिनांक १/१२/२०१६ मधील अटी व शर्तीनुसार सुरक्षा रक्षकांना गणवेश व गणवेश साहित्याचा पुरवठा करण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविलेली आहे. सदर ई-निविदा प्रक्रियेमध्ये खुल्या स्पर्धेतून कापड व चामडी बूटाची खरेदी करण्याच्या दृष्टीने विविध कंपन्यांचा सहभाग असावा यादृष्टीने सन २०२३-२४ करीता ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे.

सदर ई-निविदा प्रक्रियेमध्ये मे. रेमंड कंपनीने सहभाग नोंदविलेला नाही, परंतु रेमंड कंपनीच्या वितरकांनी ई-निविदा प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदविलेला आहे. सबब, मे. रेमंड कंपनीच्या वितरकांकडून गणवेश कापडाची खरेदी करण्यात आलेली आहे. तसेच मे.बाटा कंपनीने अथवा त्यांचे वितरकांनी ई-निविदा प्रक्रियेमध्ये सहभाग न नोंदविल्याने सन २०२३-२४ करीता मे.बाटा कंपनीकडून चामडी बूटाची खरेदी करण्यात आलेली नाही. तथापि, मंडळाच्या सुरक्षा रक्षकांना अत्यावश्यक व अद्ययावत सुविधा पुरविण्याच्या दृष्टीकोनाबाबत मंडळामार्फत वेळोवेळी प्रयत्न करण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर येथील शाहू मार्केट रेल्वे यार्डातील माथाडी कामगारांची मजूरी व लेव्हीचा माथाडी मंडळात भरणा करणेबाबत

**(१२) २०५१६ (०८-०८-२०२३) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथील शाहू मार्केट रेल्वे यार्डातील कोल्हापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळात नोंदीत असलेले ठेकेदार मे. जी. व्ही. आलूरकर आस्थापनेचे मालक व टोळीचे मुकादम यांच्यावर माथाडी कायदा व योजनेच्या तरतुदीनुसार योग्य ती कारवाई करून कामगारांना न्याय मिळवून देण्याचे

आदेश तत्कालीन मा.कामगार मंत्री, मा.उपमुख्यमंत्री तसेच मा.कामगार आयुक्त यांनी सन २०१२ पासून वेळोवेळी दिलेले असतानाही कोल्हापूर माथाडी मंडळाने मे. आलुरकर आस्थापनेतील सर्व श्री.माने व शेडगे आणि इतर ५४ माथाडी कामगारांना अद्याप काम मिळवून दिले नसल्याचे माहे जून,२०२३ च्या प्रथम सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नोंदणीकृत आस्थापना व टोळीचे मुकादम हे कामगारांनी केलेल्या कामाचा विहीत नमुन्यातील मासिक तपशील माथाडी मंडळात जमा करत नसल्यामुळे कामगारांची मजूरी व लेव्हीची ८२ कोटींची रक्कम थकित राहिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माथाडी संघटनेने रेल्वे प्रशासनाकडून माहिती अधिकार अधिनियमांतर्गत. मधून माहिती उपलब्ध करून रेल्वे यार्डात चालणाऱ्या लोडींग-अनलोडींगचा तपशील माथाडी मंडळात सादर केलेला असून माथाडी मंडळाने त्याची कराराप्रमाणे तपासणी केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी ठेकेदार मे. जी. व्ही. आलुरकर व मंडळ अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (११-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

कोल्हापूर रेल्वे माल धक्यावरील मे. जी. व्ही. आलुरकर या आस्थापनेला सुपुर्द केलेले नोंदीत माथाडी कामगार १. श्री.नाना तुकाराम शेंडगे २. श्री.जानबा शिवाप्पा माने यांच्या बाबतीत मंडळाने आवश्यक तपासणी केली असून मंडळाने दिलेल्या आदेशानुसार आस्थापनेने त्यांना कामावर न घेतल्यामुळे मंडळाने त्यांच्या वेतनाबाबत आस्थापनेविरुध्द वसुली प्रक्रिया पार पाडुन तसे आदेश मंडळामार्फ़त निर्गमित करण्यात आले आहेत. मात्र या प्रकरणामध्ये सदरहु आस्थापनेने मा.उच्च न्यायालयात अपिल दाखल केले असून याचिका न्यायप्रविष्ट आहे.

तसेच इतर ५३ कामगारांना कामावर रुजू करुन घेण्याच्या अनुषंगाने मंडळामार्फत मे. जी. व्ही. आलूरकर आस्थापनेस निर्देश देण्यात आले आहेत. मात्र आस्थापनेने कोल्हापूर माल धक्यावर अतिरिक्त काम उपलब्ध नसल्याने जादा कामगारांची मागणी नसल्याचे कळविले आहे.

(२) कोल्हापूर माथाडी मंडळाकडे नोंदीत आस्थापना व कामगार यांनी दरमहा केलेल्या कामाचा तपशिलासह झालेली मजूरी व लेव्हीचा भरणा मंडळाकडे येत आहे,तसेच कामगारांची मजूरी व लेव्हीचे ८२ कोटींची रक्कम थकविली आहे, अशी कोणतीही बाब मंडळाच्या निदर्शनास आलेली नाही, असे मंडळाने कळविले आहे.

(३) व (४) महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन यांनी दिनांक ३१/०१/२०१९ रोजीच्या अर्जाव्दारे सदर आस्थापनेविरुध्द केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मंडळामार्फत चौकशी अधिकारी नेमून चौकशी करण्यात आली आहे.

अर्जदार संघटनेच्या तक्रार अर्जानुसार मंडळामार्फ़त चौकशी अधिकारी नेमला होता.त्यांनी माथाडी हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९६९ च्या कलम १३ अंतर्गत संबंधित सर्व घटकांची पडताळणी करुन चौकशी अधिकारी तथा प्राधिकृत अधिकारी यांनी चौकशी अहवाल मंडळास सादर केलेला आहे. चौकशी प्रकरणातील सुनावणीमध्ये मे. जी व्ही. आलूरकर या आस्थापनेने मंडळाकडे कमी भरणा केले असल्याचे वा अनोंदीत कामगारांकडून काम करीत असल्याचे

निष्पन्न झालेले नाही,असे मंडळाने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सातारा जिल्ह्यातील एमआयडीसी मध्ये स्थानिक कामगारांऐवजी परप्रांतीय कामगारांना प्राधान्य मिळत असल्याबाबत

**(१३) २०५४४ (०८-०८-२०२३) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यातील एमआयडीसीमध्ये स्थानिक कामगारांना काम मिळत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली असून उक्त एमआयडीसीमध्ये माथाडी कामासाठी स्थानिक कामगारांऐवजी परप्रांतीयाला प्राधान्य दिले जात असून ठेकेदार माथाडी कायद्याची अंमलबजावणी करत नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सातारा एमआयडीसी मध्ये कामगार नियुक्त करताना स्थानिक भूमिपुत्रांच्या हाताला काम मिळावे याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी एमआयडीसी समवेत समन्वय साधून उद्योग विभागाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर सातारा जिल्ह्यातील स्थानिक माथाडी कामगारांना सदर एमआयडीसीत काम मिळावे तसेच उक्त प्रकरणी दोषी असणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई व्हावी यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**ॲड. आकाश फुंडकर (११-०३-२०२६) :** (१) (२) व (३) माथाडी कामगारांना प्राधान्य देण्याबाबत ज्या आस्थापनेमध्ये माथाडी स्वरुपाचे काम चालते त्याबाबत मंडळाकडे आस्थापना, कामगार अथवा कामगार संघटनेकडून अर्ज सादर झाल्यास मंडळ अथवा माथाडी निरीक्षक आस्थापनेमध्ये निरीक्षण करुन नियमानुसार कार्यवाही करुन सदर ठिकाणी माथाडी स्वरुपाचे काम करणाऱ्या कामगारांना मंडळामध्ये माथाडी कामगार म्हणून नोंदीत करण्यात येते.
तसेच शासन निर्णय दिनांक १७/११/२००८ मधील तरतूदीनुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापित समितीमार्फत स्थानिय लोकांना रोजगार मिळण्याबाबत नियमित आढावा घेण्यात येतो. त्या अनुषंगाने सातारा जिल्ह्यातील लघू, मध्यम व मोठ्या उद्योग घटकांमध्ये देण्यात आलेल्या रोजगारांपैकी ९० टक्के रोजगार स्थानिक लोकांना देण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ईपीएस पेन्शन धारकांना वाढीव पेन्शन लागू करण्याबाबत

**(१४) २१३२९ (०५-०१-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन आणि अशा प्रकारच्या अनेक महामंडळामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्त झाल्यावर ईपीएस पेन्शन लागू करण्यात आली, परंतु त्यानुसार या ईपीएस

पेन्शनधारक कर्मचाऱ्यांना फक्त १ हजार रुपये पेन्शन मिळते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात जवळपास दोन लाखाच्यावर ईपीएस पेन्शनधारकांची संख्या असून आजच्या महागाईच्या युगात १ हजार रुपयाचे पेन्शन अत्यंत कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात केंद्र शासनाने स्थापन केलेल्या समितीच्या अहवालाच्या शिफारशीनुसार शासनाने पेन्शनधारकांना वाढीव पेन्शन लागू करण्यात आली नसल्याची बाब माहे सप्टेंबर,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात ईपीएस पेन्शनधारकांना केंद्र शासन अथवा शासनाच्या धोरणानुसार वाढीव पेन्शन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (०८-०५-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

मे. महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ही आस्थापना भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे नोंदणीकृत आहे. सद्य:स्थितीत आस्थापना बंद आहे. EPS योजनेंतर्गत समाविष्ट असलेल्या कोणत्याही सदस्याचे पेन्शन, पीएफ समाविष्ट असलेल्या आस्थापनांमधील सदस्याचा सेवा कालावधी (पेन्शनपात्र सेवा) तसेच वेतन (पेन्शनपात्र वेतन) यावर आधारित असते. EPS १९९५ च्या परिच्छेद १२ नुसार पेन्शनपात्र सेवा आणि पेन्शनपात्र वेतनाच्या आधारावर पेन्शनची गणना केली जाते. EPS योजनेनुसार सेवानिवृत्त सदस्याची किमान पेन्शन रुपये १,०००/- आहे.

(२) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्यात ईपीएस योजनेंतर्गत पेन्शनधारकांची संख्या एकूण १२,३६,८२६ इतकी आहे. या सर्व सभासदांची पेन्शनची रक्कम एकसारखी नसते. ती त्यांच्या निवृतीवेतनपात्र सेवा आणि पेन्शनपात्र वेतनावर अवलंबून असते.

(३) व (४) पेन्शनसाठी पात्र असलेल्या सदस्यांना त्याच्या नियोक्त्यांमार्फत उच्चतम पेशनसाठी (Higher Pension) प्रमाणित कागदपत्रांसह दिनांक ३१/०५/२०२३ पर्यंत अर्ज मागवण्यात आले होते. प्राप्त झालेल्या अशा सर्व अर्जाची संबंधित भविष्य निधी कार्यालयाकडून छाननी केल्यानंतर पात्रतेनुसार पात्र सदस्यांच्या पेन्शनमध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील महिला सुरक्षेकरिता ‘विशाखा’समित्यांची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१५) २१४२६ (०४-०१-२०२४) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय तसेच खासगी कार्यालये, कंपन्या, दुकाने आदी ठिकाणी कार्यरत असलेल्या १० पेक्षा कमी महिला कर्मचाऱ्यांच्या कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेसाठी महिलांचे लैंगिक शोषण प्रतिबंधासाठी ‘विशाखा “ समिती कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खासगी आस्थापनांनी या शासन निर्णयाकडे दुर्लक्ष केले असून काही कार्यालयांमध्ये या समित्या नावापुरत्याच असून महिलांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण मिळत नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने माहिती घेवून या समितींची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (०२-०३-२०२६) :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

ज्या आस्थापनांमध्ये १० पेक्षा कमी कर्मचारी कार्यरत आहेत अशा कार्यालयातील लैंगिक छळाच्या तक्रारी जिल्हा स्तरावरील गठीत करण्यात आलेल्या स्थानिक समितीकडे करण्याची तरतूद आहे.

त्यानुसार सर्व जिल्ह्यात जिल्हानिहाय एकूण ३६ इतक्या स्थानिक समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच राज्यात डिसेंबर, २०२५ अखेर शासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये एकूण १,२०,४३३ अंतर्गत समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. उर्वरीत ठिकाणी समिती स्थापन करण्यासाठी आयुक्त स्तरावर बैठक आयोजित करुन क्षेत्रिय कार्यालय प्रमुखांशी समन्वय साधून बैठका आयोजित करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात भटक्या विमुक्त जाती जमातीसाठी यशवंतराव चव्हाण घरकुल योजनेचा लाभ मिळाला नसल्याबाबत

**(१६) २१७८२ (०४-०१-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात भटक्या विमुक्त जाती जमातीसाठी यशवंतराव चव्हाण घरकुल योजना शासनाने दहा वर्षांपूर्वी जाहीर केली होती परंतु या योजनेचा योग्य लाभ अद्यापही मिळाला नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ च्या मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोंदिया जिल्ह्यात या योजनेच्या अंमलबजावणीची अवस्था निराशाजनक असल्यामुळे घरकुलासाठी भोई समाजातील कार्यकर्त्यांनी समाज जागृती करण्याचे आव्हान जिल्ह्यातील एकलव्य संघटनेने केले आहे, या घरकुल योजनेत सोबत विद्यार्थी वसतिगृह, तालुका व जिल्हा स्तरावर समाज भवन, शासकीय योजना पासून वंचितांची बीपीएल मध्ये नोंद करणे, महिला सक्षमीकरण, बेरोजगारासाठी लघु उद्योग योजना, व्हि. जे.एन. टी. यांची जातगणना, आदी मागण्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१८-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत सन २०२१-२२ ते २०२४-२५ या कालावधीमध्ये

विविध जिल्ह्यांतील १२ वसाहती व १,५५,८६० वैयक्तिक घरकुल लाभार्थ्यांना आणि त्यांकरीता एकूण रुपये १९६७.४७ कोटी इतक्या निधीस मंजुरी देण्यात आली आहे.
(२) व (३) यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील १६९६ घरकुल लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आली असून त्यांकरीता आजपावेतो रुपये १९.७० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सद्य:स्थितीत १०२२ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी आणि विद्यार्थीनींसाठी गोंदिया जिल्ह्यात वसतिगृहे सुरु करण्यात आली आहेत. तसेच वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत भोई समाजातील लाभार्थ्यांना बीज भांडवल कर्ज योजना, थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, इ.योजनांचा लाभ देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील वैद्यकीय शिक्षणात सुधारणा करणेबाबत

**(१७) २२४२३ (१९-०४-२०२४) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील BHMS, BAMS, BUMS पदवीधारक डॉक्टर ऍलोपॅथी चिकित्सेने उपचार करून रुग्णांची फसवणूक करत असल्यामुळे वैद्यकीय शिक्षणाच्या बाबतीत सुधारणा करून नवीन वैद्यकीय धोरण राबविणेबाबत मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री, तहसिलदार तथा दंडाधिकारी, वसई यांचेकडे वकील श्री.प्रविण पाटील, मु. शिरगांव, पो. चंदनसार, विरार (ता.वसई, जि.पालघर) यांनी पत्राद्वारे विनंती केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात एकूण ४६ होमिओपॅथिक, ८० आयुर्वेदिक, २१ शासकीय, ५९ खासगी, ५ युनानी महाविद्यालये कार्यरत असून केवळ कमी फी आणि सोपा अभ्यासक्रम यामुळे ९० ते ९५ टक्के BHMS, BAMS, BUMS पदवीधारक हे सम चिकित्सा पध्दतीने सराव न करता अनिवार्य ऍलोपॅथी या विषम चिकित्सा पध्दतीने चिकित्सा करत असल्याने नवीन वैद्कीय शिक्षणाचे धोरण लागू करणेबाबत कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(३) असल्यास, या सर्व प्रकरणाबाबत शासनाने मान्यता दिलेल्या क्लिनिकला व वैद्यकीय महाविद्यालयाची विनाविलंब सखोल चौकशी होऊन सर्व संबंधित बोगस पदवीच्या डॉक्टरांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०६-०३-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) शासन निर्णय क्र. सीआयएम १०९९/१२२/सीआर २५/९९/ॲक्ट दिनांक २३/०२/१९९९ व शासन निर्णय क्र. सीआयएम/१०९१/सीआर १७९९/९१ (पार्ट व्ही) ॲक्ट दिनांक २५/११/१९९२ नुसार महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ या कायद्याला संलग्न असलेला अनुसूची "अ", "अ-१", "ब", "ड" मध्ये अर्हता धारण करणाऱ्या परिषदेच्या नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायींना (आयुर्वेद व युनानी) आधुनिक चिकित्सा पध्दतीचा अवलंब करण्यास मान्यता देण्यात आली आहे. शासन निर्णय दिनांक १३/०८/२०१४

अन्वये नोंदणीकृत होमियोपॅथी वैद्यकीय व्यावसायिकांना आधुनिक वैद्यक शास्त्रात व्यवसाय करण्याच्या अनुषंगाने आधुनिक औषध शास्त्र प्रमाणपत्र (CCMP) अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.तसेच महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसायी (सुधारणा) अधिनियम २०१४ मधील कलम २५(४) व (५) नुसार पदव्युत्तर अर्हताधारण करणाऱ्या भारतीय वैद्यक पध्दतीमधील नोंदणीकृत व्यवसायी त्यांनी घेतलेल्या प्रशिक्षाणाच्या व्याप्तीपुरता नवीनतम ज्ञान कौशल्ये व तंत्रशास्त्रविषक प्रगतीचा वापर करण्यास व व्यवसाय करण्याची परवानगी शासनाने दिलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कोरोनानंतर बंद पडलेल्या उद्योगधंदे व बेरोजगार कामगारांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(१८) २३१८२ (२०-०७-२०२४) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना कालावधीनंतर दिनांक १ जुलै, २०२० ते दिनांक १५ डिसेंबर, २०२३ या कालावधीत वा त्यासुमारास जवळपास ८ हजार ३३५ सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे युनिट बंद पडले असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उद्योग बंद झाल्यामुळे कामगारांवर उपासमारीचे वेळ आली असून सद्य:स्थितीत बेरोजगार झालेल्या कामगारांची संख्या काय आहे, तसेच सदर बंद पडलेले उद्योगधंदे पुर्वरत सुरु करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (३०-०३-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मर्या., मुंबई यांनी त्यांच्या अधिनस्त औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांना कोरोना विषाणूंचा वाढता प्रादुर्भाव विचारात घेऊन

(अ)विविध शुल्क भरण्याकरीता विलंबशुल्क न आकारता कालावधी वाढविणे.

(ब) विनाशुल्क मुदतवाढ मंजूर करणे.

(क) विनाशुल्क मुदतवाढ प्रकरणे तत्परतेने मंजूर करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान केलेल्या अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे.

अशा प्रकारे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उद्योगांतील अडचणी कमी करण्यासाठी उद्योजकांना मुभा/सूट देण्यासाठी वरील धोरणात्मक निर्णय घेतलेले आहेत.

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, शासन निर्णय, दिनांक १८ ऑगस्ट, २०२१ अन्वये पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद उद्योग घटकांसाठी विशेष अभय योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. या योजनेंतर्गंत पात्र ठरणाऱ्या घटकाने राज्य शासनाची सर्व मुद्दलाची रक्कम एकरकमी भरल्यास व्याज व दंडव्याज माफ केले जाते. सदर योजना ही राज्य शासनाची सर्व प्रकारची देणी म्हणजेच विक्रीकर, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या थकबाकीची मूळ रक्कम, व्याज व दंडव्याज इत्यादीसह जी रक्कम येईल ती सर्व रक्कम थकबाकी असेल, सदर योजना निमशासकीय संस्था, शासकीय संस्था,

शासकीय कंपन्या व महामंडळे यांच्याकडील थकीत देण्यांसाठी देखील लागू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भायखळा (मुंबई (द.)) येथील धोकादायक इमारतींचा व चाळींचा पुनर्विकास करण्याबाबत

**(१९) २४०३४ (२२-०७-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भायखळा (मुंबई (द.)) येथील धोकादायक इमारती व चाळींचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याने या इमारतींचा व चाळींचा पुनर्विकास करण्याची मागणी स्थानिक रहिवाशांनी केली असल्याची बाब माहे एप्रिल २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भायखळा परिसरातील जुन्या चाळी व इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे (३०-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मुंबई शहरातील धोकादायक, जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने होण्यासाठी म्हाड अधिनियम, १९७६ मध्ये दिनांक ०२/१२/२०२२ रोजी नवीन कलम ७९ (अ) व ९१ (अ) अंतर्भूत करण्यात आले आहे. सदर कलम ७९ (अ) नुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने अथवा सक्षम प्राधिकाऱ्याने मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारत धोकादायक घोषित केल्यानंतर संबंधित इमारतीच्या मालकास सर्वप्रथम तद्नंतर इमारतीच्या भाडेकरुंच्या नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेस इमारतीच्या पुनर्विकासाची कालबध्द संधी देण्याची तरतूद आहे. त्यांनी देखील विहित कालमर्यादेत पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर न केल्यास अशा इमारतींचे भूसंपादन करुन पुनर्विकास म्हाडा/मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत करण्याची तरतूद केली आहे.

तसेच, म्हाड अधिनियम १९७६ मधील नवीन कलम ९१(अ) नुसार उपकर प्राप्त इमारतींचे रखडलेले/अधर्वट अवस्थेत सोडलेले पुनर्विकास प्रकल्प म्हाडामार्फत ताब्यात घेऊन पुनर्विकास करण्याची तरतूद आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा व निकालांची प्रतिक्षा असल्याबाबत

**(२०) २४२२९ (१६-०७-२०२४) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) मागील तीन वर्षातील पाच महत्वाच्या परिक्षांचे निकाल प्रलंबित असल्याचे तसेच बारा विभागातील विविध पदांच्या परीक्षा प्रलंबित असल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्य:स्थितीत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या एकही परीक्षा नियोजित वेळेत पार न पडल्यामुळे तसेच अनेक अभ्यासक्रम प्रलंबित असल्याने राज्यातील अनेक विद्यार्थी नैराश्य अवस्थेत जात

असून मराठा आरक्षण किंवा अन्य कारणांनी प्रलंबित असलेल्या परीक्षा पाहतां त्यांची शारिरीक चाचणी माहे जून, २०२४ रोजीपर्यंत आयोगाने घ्याव्यात, अशी मागणी स्टुडंट राईट्स असोसिएशन ऑफ इंडिया या संस्थेने शासनाकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१५-०४-२०२६) :** (१) हे खरे आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या राज्यसेवा (मुख्य) परीक्षा, २०२२, पोलीस उपनिरीक्षक परीक्षा-२०२२, महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा-२०२३ या परीक्षांचे अंतिम निकाल न्यायालयीन प्रकरणांमुळे जाहीर करण्यात आले नव्हते. राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०२२ चा अंतिम निकाल दिनांक २५ ऑक्टोबर, २०२४ रोजी, पोलीस उपनिरीक्षक-२०२२ चा अंतिम निकाल दिनांक १० जानेवारी, २०२५ रोजी आणि गट-क परीक्षेचा अंतिम निकाल दिनांक ११ जुलै, २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे.
(२) शारिरीक चाचणी माहे जून, २०२४ रोजीपर्यंत आयोगाने घ्याव्यात अशा स्वरुपाची स्टुडंट राईट्स असोसिएशन ऑफ इंडिया या संस्थेची मागणी शासनास अथवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे प्राप्त झालेली नाही.

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब परीक्षा-२०२२ मधील पोलीस उपनिरीक्षक संवर्गाची शारिरिक चाचणी कार्यक्रम दिनांक २४ मे, २०२४ ते ६ जून, २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता.सदर परीक्षेचा अंतिम निकाल दिनांक १० जानेवारी, २०२५ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिनांक ०१ जानेवारी, २०२४ ते फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत ९७ संवर्गांचा अभ्यासक्रम प्रसिध्द केला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.